रविवार दि. २१ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरलता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शनी मंदिर चौक ते एस.बी. हायस्कूल मार्गावर वाहतूक कोंडी; अवजड वाहनांच्या प्रवेशामुळे नागरिक त्रस्त

## नो-एंट्री असूनही अवजड वाहनांची वर्दळ; बेकायदेशीर पार्किंगमुळे रस्ता अरुंद, पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील शनी मंदिर चौक ते एस.बी. हायस्कूल या महत्त्वाच्या मार्गावर अवजड वाहनांची वाढती वर्दळ आणि रस्त्याच्या कडेला होणारे बेकायदेशीर पार्किंग यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. या मार्गावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही मोठ्या प्रमाणात ट्रक, मालवाहू वाहने आणि इतर जड वाहने ये-जा करत असल्याचे चित्र दिसून येत असून, याकडे पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शनी मंदिर चौक ते एस.बी. हायस्कूल हा मार्ग शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग असून येथे शाळा, व्यावसायिक आस्थापने, दुकाने तसेच निवासी वसाहती मोठ्या प्रमाणात आहेत. दिवसभर या मार्गावर विद्यार्थी, पालक, महिला आणि ज्येष्ठ



नागरिकांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत अवजड वाहनांची ये-जा नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याचे सांगितले जात आहे.

**नो-एंट्रीच्या नियमांकडे दुर्लक्ष?**

या मार्गावर अवजड वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध असतानाही काही वाहने सर्रासपणे शहरात प्रवेश करत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे वाहतूक कोंडीसह अपघाताची शक्यता देखील वाढत आहे. विशेषतः शाळा सुरू व सुटण्याच्या वेळेत या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक दबाव निर्माण होतो. त्यातच मोठी वाहने रस्त्यावर आल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

**बेकायदेशीर पार्किंगमुळे रस्ता झाला अरुंद**

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना विनापरवाना किंवा नियमबाह्य *(पान २ वर)*


# जालन्यात कचऱ्याच्या ढिगाला भीषण आग; छोटा हत्ती वाहनाचे मोठे नुकसान

## भोकरदन नाका परिसरातील सागर हॉटेलच्या पाठीमागील घटना; वारंवार कचरा साचत असल्याने नागरिक संतप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील भोकरदन नाका परिसरात शनिवारी दुपारी कचऱ्याच्या ढिगाला अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. सागर हॉटेलच्या पाठीमागील भागात साचलेल्या कचऱ्याला लागलेल्या या आगीत जवळ उभ्या असलेल्या एका छोटा हत्ती वाहनाच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार दि. २० जून रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास सागर हॉटेलच्या पाठीमागील मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात साचलेल्या कचऱ्याच्या ढिगातून अचानक धूर निघू लागला. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने परिसरात



घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत आगीच्या झळा जवळ उभ्या असलेल्या छोटा हत्ती वाहनापर्यंत पोहोचल्या आणि वाहनाच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले.

**वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप**

स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. नियमितपणे कचरा उचलला जात नसल्यामुळे येथे मोठमोठे कचऱ्याचे ढिग साचून राहतात. काही अज्ञात व्यक्तींकडून या कचऱ्याला आग लावली जात असल्याने अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. कचरा *(पान २ वर)*

# मोक्ष लॉजवर पुन्हा एएचटीयूचा छापा; वारंवार कारवाईनंतरही बसस्थानक परिसरातील अवैध रॅकेटवर प्रश्नचिन्ह

## एका पीडित महिलेची सुटका; व्यवस्थापकासह संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील बसस्थानक परिसरातील मोक्ष लॉजवर शुक्रवारी रात्री अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (एएचटीयू) पुन्हा एकदा धाड टाकत कथित देहव्यापाराचा पर्दाफाश केला. या कारवाईदरम्यान एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून, लॉज व्यवस्थापक सुभाष अंबादास वैद्य, संतोष जाधव तसेच फरार असलेल्या लॉज मालक सचिन पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बसस्टँड रोडवरील मोक्ष



लॉजमध्ये महिलांना ठेवून त्यांच्याकडून अनैतिक व्यवसाय करून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने शुक्रवारी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला.

**पीडित महिलेची सुटका; रोख रक्कम व साहित्य जप्त**

छाप्यामध्ये एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली. घटनास्थळावरून रोख रक्कम तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले असून, ग्राहक म्हणून आलेल्या एका युवकालाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा, १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५, ६ आणि ७ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**वारंवार कारवाईनंतरही प्रश्न कायम**

विशेष म्हणजे, संबंधित लॉजवर यापूर्वीही अनेक वेळा पोलिसांकडून कारवाई झाल्याची चर्चा स्थानिक पातळीवर आहे. वारंवार छापे पडूनही त्याच ठिकाणी पुन्हा अशा प्रकारची कारवाई होत असल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.

काही नागरिकांच्या मते, अशा घटनांमुळे केवळ छापे टाकण्यापेक्षा *(पान २ वर)*

# जालना शहरतील गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांचीही नावे जाहीर करा - संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर

**जालना- प्रतिनिधी**

शहरातील दत्तनगर येथे हर्शल मोटवानी व सौरभ मोटवानी यांना काही अज्ञात समाजकंटकांनी क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून मारहाण केल्याचीन घटना नुकतीच घडली. या घटनेची माहिती कळताच शिवसेना संपर्कप्रमुख श्री.भास्करराव अंबेकर यांनी पदाधिकाऱ्यांसह मोटवानी

त्यांच्या निवास्थानी जाऊन भेट घेतली व अत्यंत भयभीत झालेल्या मोटवानी कुटुंबीयांना धीर दिला. यावेळी यांच्यासोबत



माजी शहरप्रमुख बाला परदेशी,

नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, योगेश भगत, दीपक राठोड, अर्जुन गेही, माजी शहरप्रमुख घनशाम खाकीवाले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जालना शहरातील वाढत्या गुंडगिरीचा बिमोड करण्यासाठी त्यांना संरक्षण देणाऱ्यांची नावे जाहीर करण्याची मागणी करतांना म्हणाले की, शहरात गुंडांना कायद्याचा धाक राहिला नाही. पोलीस प्रशासनाचा वचक कमी झाल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. गुन्हेगारांना अटक केल्यानंतर लगेच त्यांना सोडवण्यासाठी त्यांचे रक्षणकर्ते तेथे हजरच असतात. अशा गुंडांना पाठबळ देणाऱ्या रक्षण कर्त्यामुळे शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. करिता गुन्हेगारांचे संरक्षण करणारे राजकीय अथवा अराजकीय कोणीही असोत त्या व्यक्तींची नावे जाहीर करावीत जेणेकरून गुन्हेगारांना नेमके कोण पाठबळ देते हे जनतेला कळेल. जालना शहर हे गावठी कट्ट्यांचे केंद्र बनले आहे. अनेकांचे यामुळे निष्पाप बळी गेले आहेत. तरुण पिढी नशेच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत आहे. नशेच्या गोळ्या खाऊन शहरात दहशत निर्माण केली जात आहे. अशा गुंडांना कायद्याची भीती वाटत नाही. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर करून चौका-चौकात असे गुंड झोडपून काढले पाहिजेत. जेणेकरून सामान्य नागरिकांच्या मनातील भीती त्यामुळे दूर होईल. जालन्यात *(पान २ वर)*

# मराठवाडा कन्याने जागतिक पातळीवर गाजवले महाराष्ट्राचे नाव

**परतूर - प्रतिनिधी**

भूतान येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथिल वंशिका उज्वला अनिल कांबळे यांनी भारतीय महिला संघात यशस्वी खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकविले विशेष बाब म्हणजे मराठवाड्यातील एकमेव महिला खेळाडू म्हणून त्यांची निवड झाली होती आतापर्यंत पाच राज्यपातळीवर चार राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी आट्यापाट्या खेळायला आपले करिअर



म्हणून निवडले आहे या निवडीबद्दल महाराष्ट्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.मराठवाड्यातील खेळाडू असल्यामुळे मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या वतीने तिचा विशेष सत्कार त्यांच्या निवासस्थानी करण्यात आला यावेळी विलास शेकुजी पाटील, दादाराव गवळी ,पीएम श्री जिल्हा परिषद परतूर चे कैलाश गाडगे. प्रविण शिंदे.विलास पाटील, व यावेळी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मास्टर अनिल कांबळे उपस्थित होते.

## जालना जिल्ह्यात 'तक्रार निवारण दिन' यशस्वीरित्या संपन्न

# एकाच दिवसात २०२ प्रलंबित अर्जांचा निपटारा

## वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती; नागरिकांच्या तक्रारींना तातडीने न्याय देण्याचा प्रयत्न

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी व अर्जांचे जलदगतीने निवारण व्हावे, तसेच पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शुक्रवार, दि. २० जून २०२६ रोजी विशेष 'तक्रार निवारण दिन' यशस्वीरित्या राबविण्यात आला. मा. पोलीस अधीक्षक, जालना यांच्या आदेशान्वये सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर ही विशेष







मोहीम घेण्यात आली.

या उपक्रमात नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी, अर्ज आणि विविध प्रकारच्या निवेदनांवर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने सुनावणी घेत कार्यवाही केली. विशेष म्हणजे, या मोहिमेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्वतः विविध पोलीस ठाण्यांना भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधला.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष संनियंत्रण**

तक्रार निवारण दिनाच्या अनुषंगाने विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित पोलीस ठाण्यांना भेटी देऊन प्रलंबित अर्जांची पाहणी केली. त्यामध्ये मा. पोलीस अधीक्षक यांनी सेवली पोलीस ठाण्यास भेट दिली. मा. अपर पोलीस अधीक्षक यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्याची पाहणी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना यांनी जालना तालुका पोलीस ठाण्यात उपस्थित राहून तक्रारींचे निवारण केले. उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड यांनी तीर्थपुरी पोलीस ठाण्यात नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी, परतूर यांनी आष्टी पोलीस ठाण्यात उपस्थित राहून अर्जांचा आढावा घेतला.

उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन यांनी भोकरदन पोलीस ठाण्यात विशेष सुनावणी घेतली.

**२०२ अर्जांचा यशस्वी निपटारा**

या विशेष मोहिमेदरम्यान संपूर्ण जिल्ह्यातील पोलीस ठाणे व उपविभाग स्तरावरील प्रलंबित अर्जांचे परीक्षण करण्यात आले. त्यामध्ये एकूण १८७ स्थानिक स्तरावरील अर्ज तसेच १५ वरिष्ठ स्तरावरील *(पान २ वर)*

# आरोग्यासाठी योगा,पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन,मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे.त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे.अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात.कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात.पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात.परंतू शारिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.यामुळे डोक्यावर तान येणे,डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो.परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे,व्यायाम करणे,जिमनॅस्टिक,किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु- युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी,साधु-संत, महायोगी,तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण,धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे. भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे.त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी ''घर तीथे झाड'' ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात



३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार-खासदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे.कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे.त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.कारण ''आरोग्य हिच संपत्ती''हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे.त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी ''अनमोल रत्न'' व ''संजिवनी'' सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा ''संकल्प'' करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी,तपस्वी,महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वाचकांचे मनोगत करिता

इराण - अमेरिका युद्ध साडेतीन महिन्यांनी थांबले ट्रॅम्प आणि पेझेश्कियन यांच्या कडून करारावर स्वाक्षरी केल्या,होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाली.दोन्ही बाजुंनी केल्या एकाचवेळी ऐतिहासिक स्वाक्षऱ्या.अमेरीकेचे संरक्षण मंत्री हेगसेथ यांनी इराणने करारातील अटींचे पालन केले नाही तर अमेरिका पुन्हा कठोर नोदल नाकेबंदी करून शकते असा गर्भित इशारा दिला आहे.इराण - अमेरिका युद्धाचे पडसाद जगभर उमटले.भारतात त्यांचे परिणाम झाले.पेट्रोल - डिझेल,गॅस करिता ग्राहकांच्या रांगा लागल्या होत्या.इंधन मिळण्यासाठी अडचणी येऊ लागल्या.गॅस सिलिंडर नोंदणी केल्यानंतर पंचवीस दिवसाची मर्यादा तर पंपावर फक्त वाहनात भरुन पेट्रोल डिझेल मिळू लागले.तेव्हा उपहारगृहाचे भटारखाने बंद झाले.घरातील सिलिंडर एक हजार पार तर व्यावसायीक सिलिंडर ३ हजार पार झाला. पर्यायी चुलीवर जेवण करण्यास उपहारगृहात सुरुवात झाली, महागाईने आयतेच हात धुवून घेतले.

दोन्ही देश युद्ध विश्रांतीची ग्वाही देत असले तरी,त्यावर कोणाचाच विश्वास नाही.इस्रायल शांत असला तरी तो लेबनॉन ,सिरीया मध्ये काय करेल,यांचा नेम नाही.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रॅम्प आणि इराणच्या सत्ताधीसांचा काही भरवसा नाही.अशा अनिश्चित वातावरणात शांततेच भवितव्य काय ? दोन्ही देश आपापल्या क्षेत्रात अग्रेसर आहेत.भारताचे काय ? किती वर्षे परावलंबी राहायचे .७८ वर्षात संशोधन क्षेत्रे वाढवली नाही.सत्ताधार्यांनी सत्ता टिकवण्यासाठी देशातील नागरिकांना मोफत वस्तू देणे पसंत केले.त्याऐवजी रोजगार उपलब्ध करून दिला असता तर लोक स्वावलंबी झाले असते.देशाची प्रगती झाली असती.आज,देश जातीपातीच्या राजकारणात गुंतला आहे.उरलेला वेळ राजकीय पक्षांचे खच्चीकरण करण्यासाठी उपयोगात आणता जात आहे.शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधांची वानवा आहे.तरीही आम्ही स्वतःला विश्व गुरू म्हणूनन घ्यायचे.जगाच्या स्पर्धेत भारत आजही अग्रभागी नाही.असेच, युद्धाचे पडसाद उमटले तर मात्र सामान्य माणसाचे कंबरडे मोडले.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# पान १ व ४ वरुन...

## शनी मंदिर...

पद्धतीने उभी करण्यात येणारी वाहनेही वाहतूक कोंडीचे एक प्रमुख कारण ठरत आहेत. अनेक ठिकाणी दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहने रस्त्यावरच उभी केली जात असल्याने रस्त्याची रुंदी कमी होत आहे.

परिणामी, दोन वाहने समोरासमोर आल्यास वाहतुकीचा खोळंबा होतो. अनेक वेळा नागरिकांना काही मिनिटे नव्हे तर दीर्घकाळ वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असल्याचे दिसून येत आहे.

**विद्यार्थी व नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न**

एस.बी. हायस्कूल परिसरात विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. शाळकरी विद्यार्थी रस्ता ओलांडताना अवजड वाहनांच्या हालचालीमुळे धोका निर्माण होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, वाहतूक नियमांचे प्रभावी पालन, अवजड वाहनांवर नियंत्रण आणि बेकायदेशीर पार्किंगविरोधात नियमित कारवाई केल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

**प्रशासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी**

नागरिकांनी पोलीस प्रशासन आणि वाहतूक शाखेकडे या मार्गावर विशेष लक्ष देण्याची मागणी केली आहे. नो-एंट्रीच्या नियमांची कठोर अंमलबजावणी करावी, अवजड वाहनांवर कारवाई करावी, वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी आणि बेकायदेशीर पार्किंग हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. शहरातील वाढती वाहतूक आणि रस्त्यावरील अनियंत्रित परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## जालन्यात कचऱ्याच्या...

जळाल्यामुळे निर्माण होणाऱ्या धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच वातावरणात प्रदूषण वाढत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली. लोकवस्ती आणि रुग्णालयांच्या सुरक्षेचाही प्रश्न घटना घडलेला परिसर हा दाट लोकवस्तीचा असून येथे अनेक दुकाने, व्यावसायिक आस्थापने तसेच रुग्णालये देखील आहेत. त्यामुळे कचऱ्याला लागलेली आग अधिक मोठी झाली असती तर मोठा अनर्थ घडण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली.

परिसरातील नागरिकांनी जालना महानगरपालिकेकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करत नियमित कचरा उचलण्याची व्यवस्था करावी, कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावावी तसेच येथे कायमस्वरूपी कचराकुंडी उभारावी, अशी मागणी केली आहे.

**प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांची अपेक्षा**

कचऱ्याचे वाढते ढिग, त्यातून वारंवार लागणाऱ्या आगी आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण यामुळे भोकरदन नाका परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## मोक्ष लॉजवर पुन्हा....

संपूर्ण साखळीचा शोध घेऊन त्यामागील घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. मात्र, याबाबत कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेबाबत अधिकृत निष्कर्ष येणे बाकी आहे.

**बसस्थानक परिसरातील सुरक्षेचा प्रश्न**

बसस्थानक परिसरात गेल्या काही दिवसांपासून संशयास्पद हालचाली वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. परिसरात मोठ्या प्रमाणात प्रवासी, महिला, विद्यार्थी आणि व्यापारी वर्गाची वर्दळ असते. त्यामुळे अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी परिसरात अधिक गस्त वाढविणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि संवेदनशील भागांमध्ये विशेष पथके नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

**चोरी व इतर गुन्ह्यांबाबतही चिंता**

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, बसस्थानक परिसरात चोरी, पाकीटमारी आणि इतर संशयास्पद प्रकारांमध्येही वाढ झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण परिसरात विशेष बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख आणि नियमित तपासणी मोहीम राबविण्याची मागणी होत आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रवी जोशी, पोउपनि संजय गवळी यांच्यासह महिला अंमलदार संगिता चव्हाण, निमा घनघाव, ज्योती राठोड, आरती साबळे, चित्रा चव्हाण तसेच चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी सहभाग घेतला.

**कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी**

वारंवार कारवाया होत असूनही अशा घटना समोर येत असल्याने संबंधित रॅकेटच्या मुळापर्यंत जाऊन तपास करावा, परिसरातील संशयास्पद हालचालींवर नियंत्रण आणावे आणि बसस्थानक परिसरातील सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## जालना शहरतील...

नूतन पोलीस अधीक्षक आल्यापासून मात्र नागरिकात एक आशावाद निर्माण झाला आहे. तरुण मुली, महिला, व्यापारी व सामान्य नागरिक यांच्या मनातील भीती

घालवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे भास्करराव अंबेकर म्हणाले. दरम्यान दत्तनगर येथील जखमींची विचारपूस करतानाच माजी नगराध्यक्ष

भास्करराव अंबेकर यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांना दूरध्वनीवरून सविस्तर माहिती दिली. ते अधिवेशना निमित्त मुंबईत असल्याने जालन्यात आल्यावर पोलीस अधीक्षकांची शिवसेना पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन कठोर कारवाईची मागणी करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी सांगितले.

## एकाच दिवसात...

अर्ज अशा एकूण २०२ प्रलंबित अर्ज व तक्रारींचा यशस्वीरित्या निपटारा करण्यात आला. पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांना पोलीस ठाण्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली समस्या मांडण्याची संधी मिळाली. अनेक तक्रारींवर जागेवरच निर्णय घेण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

नागरिकाभिमुख पोलीस प्रशासनाचा प्रयत्न

तक्रार निवारण दिनामुळे नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यास मदत झाली आहे. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्यावर तातडीने निर्णय घेण्याची कार्यपद्धती भविष्यातही सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस विभागाकडून सांगण्यात आले.

जालना जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांच्या समस्या सोडविण्यास गती मिळाली असून, पोलीस प्रशासन अधिक संवेदनशील व नागरिकाभिमुख असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे.

## डेटा सार्वजनिक...

प्रतिबंध घालण्यात आला आहे. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट, २०२३ कायद्याचे नियम १३ नोव्हेंबर २०२५ रोजी अधिसूचित करण्यात आले असून, मे २०२७ पर्यंत त्याची पूर्ण अंमलबजावणी अपेक्षित आहे. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट, २०२३ कायदा लागू होण्यापूर्वी, माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या सेक्शन ४३ए अंतर्गत माहिती तंत्रज्ञान (वाजवी सुरक्षा पद्धती आणि प्रक्रिया आणि संवेदनशील वैयक्तिक डेटा किंवा माहिती) नियम, २०११ संवेदनशील वैयक्तिक डेटाचे संरक्षण करत होते. गुगलसारख्या मध्यस्थांच्या जबाबदारीचा विचार करता, माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० चा सेक्शन ७९ त्यांना काही अटींसह कायदेशीर जबाबदारीतून सूट देतो. तथापि, जर मध्यस्थाने बेकायदेशीर कृत्यात सहभाग घेतला असेल किंवा त्याला प्रत्यक्ष माहिती मिळाल्यानंतरही बेकायदेशीर सामग्री त्वरित काढण्यात किंवा त्याचा प्रवेश अक्षम करण्यात अयशस्वी ठरल्यास ही सूट रद्द होते. मुंबई उच्च न्यायालयाने गुगलला ईमेल आयडी ब्लॉक करण्याचे दिलेले निर्देश हे याच तत्त्वाचा थेट वापर आहे, ज्यामुळे मध्यस्थांना बेकायदेशीर कृतींविरुद्ध कारवाई करण्यास भाग पाडले जाते. श्रेया सिंघल विरुद्ध युनियन ऑफ इंडियाया प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, प्रत्यक्ष माहिती ही न्यायालयाच्या आदेशाद्वारे किंवा अधिकृत सरकारी अधिसूचनेद्वारे प्राप्त होते.

या सायबर हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, अधिवक्ता महेश एस. धन्नावत यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले, ''आता अधिक भावनिकदृष्ट्या स्थिर होण्याची आणि कोणत्याही परिस्थितीला कसे सामोरे जायचे याबद्दल स्वतःला अद्ययावत ठेवण्याची वेळ आली आहे, कारण आपली माहिती सार्वजनिक आहे.'' हे विधान सध्याच्या डिजिटल युगातील सायबर धोक्यांचे गांभीर्य दर्शवते. एकदा आपली संवेदनशील माहिती ऑनलाइन झाली की ती किती असुरक्षित असू शकते आणि व्यक्ती तसेच संस्थांनी सायबर धोक्यांना तोंड देण्यासाठी किती तयार असले पाहिजे, यावर ते भर देतात. सायबर हल्ल्यांचे वाढते प्रमाण आणि न्यायव्यवस्थेची सक्रिय भूमिका यातून या धोक्यांचे गांभीर्य स्पष्ट होते. प्रतीक्षा फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश हा डेटा गोपनीयतेच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्व संस्थांनी, विशेषतः मुलांच्या डेटा हाताळणाऱ्या संस्थांनी, मजबूत सायबर सुरक्षा उपाययोजना करणे आणि डेटा संरक्षण कायद्यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. हा कायदेशीर लढा डिजिटल जगात उदभवणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकतो.

## घरगुती गॅस ...

नोंदी, वितरण प्रक्रिया आणि लाभार्थी यांची पडताळणी करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**जास्त दराने विक्रीचा मुद्दाही ऐरणीवर**

शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने घरगुती गॅस सिलिंडरची विक्री होत असल्याचा मुद्दाही मनसेने उपस्थित केला आहे. काही भागांमध्ये दलालांच्या माध्यमातून गॅस सिलिंडर पुरवठा होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, यामागील संपूर्ण साखळीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गॅस टंचाईच्या काळात सामान्य ग्राहकांना अनेकदा प्रतीक्षा करावी लागत असताना काही व्यावसायिक आस्थापनांना सहज उपलब्धता होत असल्याच्या तक्रारींचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी**

गॅस वितरण व्यवस्थेवर देखरेख ठेवणारे संबंधित सेल्स ऑफिसर, वितरक निरीक्षण अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मनसेच्या वतीने परतूर व मंठा तालुक्यातील सर्व एलपीजी गॅस एजन्सींची विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली असून, दोषी आढळणाऱ्या एजन्सींचे परवाने रद्द करावेत, जबाबदार अधिकाऱ्यांवर विभागीय कारवाई करावी आणि शासनाच्या योजनांचा गैरवापर करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

**प्रशासनाच्या चौकशीकडे नागरिकांचे लक्ष**

या निवेदनानंतर संबंधित यंत्रणा कोणती पावले उचलते, संभाव्य तक्रारींची चौकशी कशी केली जाते आणि वितरण व्यवस्थेतील अनियमिततेबाबत काय निष्कर्ष समोर येतात, याकडे परतूर, मंठा आणि जिल्ह्यातील गॅस ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

## धनगर समाजाच्या...

वतीने जालना जिल्हा व विषेश करुन अंबड व घनसांवगी तालुक्यातील या योजनेचा अंमल असणा-या शाळेची चौकशी समिती नेमुण चौकशी करण्यात यावी नसता दिनांक २१/०६/२०२६ पासून मौजे रुई ता. अंबड येथील ग्रा.पं.च्या पाण्याच्या टाकी वर आमरण उपोषण करण्यात येईल याची गांर्भीयपुर्वक दखल घेत उचित कार्यवाही करण्यात यावी. धनगर समाजातील विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी मिळवून देण्यासाठी उपोषण करत असल्याचे हरिभाऊ चौरे यांनी प्रतिनिधींशी बोलताना भावना व्यक्त केली.

## राजमाता जिजाऊ...

शैक्षणिक संकुल जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी, मी जाऊ कनिष्ठ महाविद्यालय कुंभारझरी, जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल मधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## पारंपारिकतेला...

कुटुंबाने या पंरपरेला फाटा देण्याचे ठरवले आणि कै. सरूबाई यांच्या रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम स्वतःच्या शेतातील मोहाच्या मळ्यात करण्यात आला. सवडे कुटुंबाने कै. सरूबाई यांच्या राखेचे विसर्जन करून त्याच ठिकाणी एका आंब्याच्या वृक्षाचे रोपण केले. नदीच्या पाण्यात अस्थी विसर्जन केल्याने त्या वाहून जातात. पण शेतात झाड लावून त्यात रक्षा विसर्जित केल्यामुळे, आईच्या स्मृती या वृक्षाच्या रूपाने कायम आमच्यासोबत.

## घामाच्या धारात...

पडेपर्यंत जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळ सत्रात भरवाव्यात. शंकर गाडेकर, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, नळविहीरा. चौकट- सध्या उन्हाळ्यापेक्षाही जास्त तापमान व उकाडा जाणवत आहे. अशातच पूर्णवेळ शाळा असल्याने विद्यार्थी व शिक्षक घामाच्या धारांत न्हावून निघत आहे. भविष्यात उष्माघात किंवा निर्जलीकरण यासारख्या गंभीर परिणामांना विद्यार्थी व शिक्षकांना सामोरे जावे लागू नाही म्हणून शिक्षक संघटनामार्फतही अर्धवेळ शाळा करणे बाबत जिल्हा प्रशासनाला विनंती करण्यात आली आहे. विशेषतः कोकणातील रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात उन्हाची तीव्रता पाहता शाळा सकाळ सत्रात भरण्याबाबत पत्र काढण्यात आले आहे. मात्र जालना जिल्हा विदर्भाला लागून असल्याने येथे कमालीचे तापमान असतानाही जिल्हा प्रशासन हा निर्णय घेण्यास टाळाटाळ का करीत आहे हेच कळत नाही. विशेष म्हणजे सकाळ सत्र शाळेत ही मध्यंतर कमी करून कामाचे पाच तास पूर्ण होत असल्याने विद्यार्थ्यांचे कुठलेही शैक्षणिक नुकसान होत नाही. नसीम शेख, तालुकाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटना, तालुका जाफराबाद.

## परवानगीशिवाय पुतळे...

घ्यावी. सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि इतर सार्वजनिक जागांवर पुतळे किंवा कोणत्याही प्रकारच्या बांधकामास परवानगी न देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्देशांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे आणि प्रशासनाचे कर्तव्य आहे.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने आपल्या निकालात हे देखील नमूद केले आहे की, पुतळ्याशी लोकांच्या भावना जोडलेल्या असल्यामुळे तो हटवताना पूर्ण सन्मानाने, काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे हलवला जावा. तसेच, योग्य पर्यायी जागा निश्चित करून आणि कायदेशीर परवानगी मिळाल्यानंतरच त्याचे पुनर्स्थापन केले जावे. ही संपूर्ण प्रक्रिया दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. यावरून न्यायालयाचा दृष्टिकोन किती संतुलित आहे हे दिसून येते. ॲड. धन्नावत यांनी शेवटी सांगितले की, ''सर्वसामान्य नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्यांना पाठिंबा देऊ नये. महापुरुषांचा सन्मान करायचा असेल, तर तो कायदेशीर मार्गानेच झाला पाहिजे. कोणताही पुतळा उभारताना स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस आणि महसूल विभागाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. कायद्याचे पालन करूनच आपण खऱ्या अर्थाने आपल्या महापुरुषांना आदरांजली अर्पण करू शकतो.''

# अन्यथा भारतात 'लोकशाही' नाममात्र उरेल..?

..राजकारणातील अपयश हे एका घटनेचे परिणाम नसते. ते दीर्घकाळ साचत गेलेल्या चुका, दुर्लक्ष आणि चुकीच्या निर्णयांचा एकत्रित परिणाम असते. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या बाबतीतही आज नेमके तेच घडताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आधी आमदारांचा मोठा गट फुटला. त्यानंतर मंत्र्यांनी साथ सोडली. आता खासदारही वेगळा मार्ग स्वीकारण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. या सर्व घडामोडींमुळे शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती व्यक्त करणारे अनेकजण आहेत. भाजपने डाव खेळला, सत्ता वापरली, दबाव निर्माण केला, अशा अनेक कारणांची चर्चा होते. त्यात तथ्यही असू शकते. मात्र प्रत्येक वेळी बाह्य कारणांकडे बोट दाखवताना स्वतःच्या नेतृत्वातील उणिवांकडे दुर्लक्ष करणे हा सर्वात मोठा आत्मघात ठरतो. याचा अर्थ असा नाही की, पक्षातून बाहेर पडलेले सर्वजण तत्त्वनिष्ठ आहेत किंवा त्यांनी घेतलेले निर्णय योग्यच आहेत.

एका पक्षाच्या तिकिटावर निवडून येऊन नंतर दुसऱ्या गटात जाणे हे नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरत नाही. मतदारांच्या विश्वासाशी तो केलेला व्यवहार असतो. त्यामुळे बंडखोर खासदार किंवा आमदारांवरील टीका योग्यच आहे. मात्र केवळ त्यांच्यावर टीका करून पक्षाची समस्या सुटणार नाही. प्रत्येक वेळी गद्दार हा शिक्का मारून पुढे जाता येणार नाही. इतके लोक गद्दारी करण्यास तयार का झाले? त्यांना पक्षात राहण्यापेक्षा बाहेर जाणे अधिक सोयीचे का वाटले? या प्रश्नांचीही उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आता नेतृत्वाने करायला हवा. कोणत्याही पक्षात एखादा नेता नाराज होऊ शकतो. काही आमदार असंतुष्ट असू शकतात. परंतु जेव्हा एकाच पक्षातील डझनावारी आमदार, मंत्री, खासदार आणि पदाधिकारी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतात, तेव्हा त्यामागे केवळ विरोधकांचे कारस्थान असते, असे म्हणणे वास्तवाला धरून ठरत नाही. विरोधक प्रत्येक पक्षाविरोधात राजकारण करत असतात. मात्र प्रत्येक पक्षात एवढी मोठी फूट पडत नाही. याचा अर्थ समस्या बाहेर जितकी आहे, तितकीच ती घरातही आहे.

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात शिवसेना ही कमालीची भावनिक संघटना होती. शिवसैनिकांचा आणि नेतृत्वाचा थेट संवाद होता. पक्षप्रमुख आपल्या पाठीशी उभे आहेत, असे सामान्य शाखाप्रमुखापासून खासदारापर्यंत प्रत्येकाला वाटायचे. बाळासाहेबांचे नेतृत्व हे संघटनात्मक नियमांपेक्षा भावनिक नात्यांवर उभे होते. त्यामुळे मतभेद असले तरी बंडखोरीचे धाडस फार कमी लोकांनी केले. उद्धव ठाकरे यांनी पक्षाची सूत्रे स्वीकारल्यानंतर संघटनेला अधिक शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यात काही प्रमाणात यशही मिळाले. मात्र त्याचवेळी नेतृत्व आणि कार्यकर्ते यांच्यातील अंतर वाढत गेले. अनेक नेते आणि कार्यकर्ते खासगीत सांगतात की, मातोश्री पर्यंत पोहोचणे अत्यंत कठीण असते. भेटीसाठी मध्यस्थांची गरज पडते. अनेकदा निर्णय प्रक्रियेतही काही मोजक्या लोकांचे वर्चस्व वाढल्याची भावना निर्माण झाली आहे. ही भावना खरी की खोटी, हा वेगळा विषय असू शकतो. पण नेत्याला आपल्या कार्यकर्त्यांची केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक गरजही ओळखावी लागते. अनेक आमदार, खासदार किंवा स्थानिक पदाधिकारी आपले प्रश्न मांडण्यासाठी पक्षप्रमुखांकडे जातात. त्यांना प्रत्येक वेळी न्याय मिळेलच असे नसते.

पण त्यांचे म्हणणे ऐकले जात आहे, त्यांना महत्त्व दिले जात आहे, ही भावना महत्त्वाची असते. जेव्हा ही भावना कमी होते, तेव्हा नाराजी वाढते. नाराजीचे रूपांतर असंतोषात होते आणि असंतोषाचे रूपांतर अखेरीस बंडात होते. गेल्या काही वर्षांत संघर्षाच्या निर्णायक क्षणी उद्धव ठाकरे पुरेशा आक्रमकतेने मैदानात उतरलेले दिसले नाहीत. शिवसेनेची राजकीय ओळख ही आक्रमकतेची होती. रस्त्यावर उतरणारा पक्ष म्हणून शिवसेना ओळखली जात होती. मात्र गेल्या काही वर्षांत ही धार बोथट झाल्याचे अनेक शिवसैनिक मानतात. हिंदुत्वाच्या प्रश्नावर असो किंवा पक्षावरील संकटांच्या काळात असो, नेतृत्व अधिक आक्रमक भूमिका घेईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांची होती. ती पूर्ण झाली नाही. निवडणुकीतील पराभव हादेखील
पक्षासाठी कठीण काळ असतो. अशा वेळी उमेदवारांना मानसिक आधाराची गरज असते. परंतु अनेकदा निवडणूक हरल्यानंतर संबंधित नेते एकाकी पडल्याची तक्रार करतात. याच बाबतीत उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व काही प्रमाणात कमी पडते. या उलट एकनाथ शिंदे आपल्या सहकाऱ्यांशी सातत्याने संपर्कात राहतात. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. त्यांना वेळ देतात. राजकारणात विचारसरणी महत्त्वाची असतेच, पण वैयक्तिक संबंधही तितकेच महत्त्वाचे असतात.

अनेकदा लोक पक्षापेक्षा व्यक्तीशी जोडले जातात.

एकनाथ शिंदे यांनी ही बाब प्रभावीपणे साधल्याचे दिसते. त्यामुळेच त्यांच्याकडे नेत्यांचा ओढा वाढत असल्याचे चित्र आहे. पक्षातील प्रत्येक फूट ही विरोधकांच्या कारस्थानामुळेच झाली, असा निष्कर्ष काढला, तर सुधारण्याची प्रक्रिया कधीच सुरू होणार नाही. आत्मपरीक्षण करणे हे कमकुवतपणाचे नव्हे, तर सक्षम नेतृत्वाचे लक्षण असते. इतिहासात अनेक नेत्यांनी पराभवानंतर स्वतःच्या चुका मान्य केल्या आणि त्यातून नव्याने उभारी घेतली. शिवसेना आजही महाराष्ट्रातील महत्त्वाची राजकीय शक्ती आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे अजूनही निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. पण केवळ याच भांडवलावर कायम राजकारण करता येणार नाही. आता संघटना मजबूत करावी लागेल. संवाद वाढवावा लागेल. नाराजांना ऐकून घ्यावे लागेल. निर्णय प्रक्रियेत अधिक व्यापक सहभाग द्यावा लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या मनात आपण त्यांच्यासाठी उपलब्ध आहोत, हा विश्वास निर्माण करावा लागेल.

आज विरोधकांच्या पक्षाला हात लावण्याची हिंमत करता आली नसती. परंतु सर्वोच्च न्यायालय निकालावर मांडी घालून बसल्याने दहाव्या अनुसूचीचे पर्यायाने भारताच्या संविधानाचे आणि लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत. सध्याचे पक्षफोडू सरकार सत्तेतून गेल्याशिवाय ही परिस्थिती बदलणार नाही. मात्र लोकशाही मजबूत ठेवायची असेल तर भविष्यात पक्षातून बाहेर पडणाऱ्या लोकप्रतिनिधीला अगोदर त्याच्या नगरसेवक,आमदार, खासदारकीचा राजीनामा द्यावा लागेल, अशी तरतूद कायद्यात करावीच लागेल. अन्यथा भारतात लोकशाही नाममात्र उरेल.



**ह भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर.**

### जाफराबाद तालुक्यात एक हजार मुलींसाठी मानव विकासच्या ११ मोफत बसेसची सोय

# १०१ गावांतील मुलींना होणार या बसेसचा फायदा

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेभुर्णी, खासगाव, वरूड बु., सिपोरा अं., माहोरा, अकोलादेव, कुंभारझरी, आळंद, सावंगी, गोंधनखेडा यासह तालुक्यातील १०१ गावांतील इयत्ता ८ वी ते १२ वीपर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी १ हजार ५० विद्यार्थिनी शिक्षणासाठी जाफराबाद शहरातील जिल्हा परिषद शाळा, सिद्धार्थ महाविद्यालय, समर्थ विद्यालय, ज्ञानसागर जिजाऊ विद्यालय यासह विविध शाळा तथा महाविद्यालयांमध्ये येतात. यावर्षी २०२६-२७ चे शैक्षणिक सत्र १५ जून, सोमवारपासून सुरू झाले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणवाढीसाठी शासनाच्या वतीने मुलींच्या शिक्षणासाठी मोफत प्रवास मानव विकास बसेसमधून दिला जातो. शासनाच्या वतीने हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून राबविला जात आहे. याला जाफराबाद **मानव विकासच्या बस रूटची नियोजन बैठक पार पडली.**



तालुक्यातील विद्यार्थिनींकडून उत्तम प्रतिसादही मिळत आहे. या चालू शैक्षणिक वर्षातील बस रूट समितीची बैठक गटविकास अधिकारी लिंबाजी बारगिरे यांच्या अध्यक्षतेखाली गटशिक्षणाधिकारी कार्यालयात १७ जून, बुधवार रोजी संपन्न झाली. यात जाफराबाद ते देऊळगावराजा, जाफराबाद ते चिखली, जाफराबाद ते भोकरदन हे रूट निश्चित करण्यात आले आहेत. या मार्गावरील विविध फाट्यांवरील जाफराबाद येथे शिक्षण घेत असलेल्या
विद्यार्थिनींना मोफत प्रवासाचा लाभ मिळणार आहे. यासाठी मानव विकासच्या ११ बसेस विद्यार्थिनींना शाळेपासून त्यांच्या गावांपर्यंत प्रवास सेवा पुरवणार आहेत. त्यामुळे शिक्षणापासून कुणीही वंचित राहता कामा नाही. याची दक्षता शिक्षण विभाग तथा शासन घेत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या संधीचा फायदा घेऊन आपले ध्येय निश्चित करावे. ध्येयप्राप्तीसाठी परिश्रम करावेत. एक ना एक दिवस ते ध्येय गाठावे. आपले पालक, गाव,
या वेळी गटशिक्षणाधिकारी वा सतीश शिंदे व सर्व केंद्रप्रमुख, ठा मुख्याध्यापक तथा तालुका समन्वयक भगवान चव्हाण सह आगार प्रमुख शरद पंडित, राहुल कुंठे यांच्यासह शिक्षण विभाग व आगार व्यवस्थापनातील कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने स्त उपस्थिती होती. यावेळी उप वतीने मानव बसेसमधून अ विद्यार्थिनींना मोफत बस प्रवास अ शासनाच्या विकासच्या मिळत असल्याने मुलींना पो शिक्षणाची गोडी निर्माण झाली आ आहे. शिक्षणाच्या बाबतीत मुलींचा टक्काही वाढला आहे. यामुळे गरीब, होतकरू, हुशार मुलींना मोठा दिलासा मिळत असल्याच्या भावना अनेक विद्यार्थिनींनी व्यक्त केल्य
तालुका, जिल्हा, राज्याचे आ नावलौकिक करावे. आपले या जीवनमान समृद्धपणे जगावे. असे आवाहन शिक्षण विभागाच्या अ मार्फत करण्यात येत आहे.

# नरसिंह विद्यामंदिर सिडको शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

**नांदेड -प्रतिनिधी**

शरद जोगदंड नवीन नांदेड येथील शैक्षणिक गुणवत्तेसाठी प्रसिद्ध असलेली नरसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळा (सिडको) येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे अत्यंत उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. १५ जून रोजी शाळा सुरू होताच परिसरात विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आले होते.शाळेच्या प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळ्या काढून, विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि गुलाब पुष्प देऊन त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एकुंडवार व्ही. ए. या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. पोहरे व्ही. एन. यांच्यासह महिला व पुरुष पालक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. बस्वदे जी. टी. यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्री. जोगदंड जे. डी. यांनी मानले.आनंददायी सुरुवात आणि मोफत पाठ्यपुस्तकेस्वागताच्या मुख्य कार्यक्रमानंतर सर्व नवोदित इयत्ता पहिली आणि बालवाडीच्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका, प्रमुख पाहुणे व शिक्षकांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याच सोहळ्याचे औचित्य साधून पहिल्या वर्गात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके हाती पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.परिसरात विद्यार्थ्यांची किलबिल व पालकांची लगबगशाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन दप्तरांसह आणि चेहऱ्यावर नवा उत्साह घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांमुळे शाळा परिसर गजबजून गेला होता. विद्यार्थ्यांची किलबिल, पालकांची लगबग आणि शिक्षकांचा उत्साह यामुळे संपूर्ण शाळेत आनंदी वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या, तसेच नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व पालकांना व विद्यार्थ्यांना पटवून दिले.शिक्षकांचे विशेष परिश्रमया संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सौ. एकुंडवार व्ही. ए., सौ. पोहरे व्ही. एन., सौ. वाडीकर पी. के., सौ. झाडे एल. बी., श्रीमती वाघमारे एम. व्ही., श्री. चौलवाड एम. बी., श्री. बस्वदे जी. टी., श्री. कोणापुरे डी. व्ही., श्री. वडजे जी. बी., श्री. जोगदंड जे. डी., श्री. जाधव जी. डी., श्री. यादव के. व्ही. आणि श्री. सिंगनवाड व्ही. व्ही. यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुस्तक परिचय - प्रेरणादायी संवाद भूषण

अनेक जण विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांतून, तर कधी समक्ष समाजाशी संवाद साधून जनजागृती करीत असतात. निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी त्यांच्या
संवाद भूषण या पुस्तकात अशा ३४ व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेतला ज्यांनी अनेक खस्ता खात, कडू- गोड अनुभव घेत आपले आणि आपल्या बरोबर इतरांचेही जीवन समृद्ध केले आहे. केवळ ओळखीचा आहे म्हणून त्याच्याबद्दल लिहिणे नव्हे; तर त्याचे वेगळेपण काय आहे? प्रतिकूल परिस्थितीवर त्याने कशी मात केली, समाजाला त्याचा काय उपयोग झाला आणि होत आहे ? आजच्या युवकांना त्यांच्याकडून काही प्रेरणा मिळू शकते का ? आदी बाबींचा बारकाईने विचार करूनच त्या त्या व्यक्तिंना या पुस्तकात स्थान देण्यात आले आहे. लेखकाने मी का लिहितो,



माझ्या लिखाणाचे स्वरूप काय? माझ्या लिखाणाचा वाचकांना, समाजाला काही उपयोग होतो का? याबद्दलची भूमिका पुस्तकाच्या मनोगतात मांडली आहे. ते म्हणतात, ''ज्या परिस्थितीत माझे बालपण, तरुणपण गेले त्या परिस्थितीचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. बिकट अशा आर्थिक , कौटुंबिक, भावनिक परिस्थितीचा मनावर होत गेलेला परिणाम त्यामुळे येत गेलेले नैराश्य, वैफल्य, ज्यांच्याकडून अपेक्षा होत्या त्यांच्याकडून झालेला अपेक्षाभंग आदींमुळे स्वतःची स्वतःला वाट शोधत रहावी लागली.यातूनच ''माणसाच्या परिस्थितीपेक्षा त्याची मनःस्थिती महत्वाची असते'' हे उमगले. म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी झालेल्या आणि इतरांनाही यशस्वी होण्यासाठी मदतीचा हात देणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी जीवनकथा लिहिण्याचा मी प्रयत्न करीत असतो ''. ''संवाद भूषण'' या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखक जेव्हापासून म्हणजे १९८३ सालापासून पत्रकारितेत आले तेव्हापासुन ज्या ज्या व्यक्तींशी त्यांचा परिचय होत गेला त्या त्या क्रमवारीने या व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्या नुसार नगर येथील छायाचित्रकार अनिल शाह, पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूट च्या वृत्तपत्र विद्या विभागातील वर्गमित्र विचारवंत- लेखक प्रा.डॉ. बाबासाहेब काझी, दूरदर्शनचे निवृत्त संचालक अशोक डुंबरे, निर्माते राम खाकाळ, निवेदिका शिबानी जोशी, कॅमेरामन नरसिंग पोतकंठी, जनमित्र विलास सरोदे, भारतीय माहिती सेवेतील निवृत्त वरीष्ठ अधिकारी सर्वश्री नितीन केळकर, मधुसूदन आडे, ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, मुख्यमंत्र्यांच्या निवृत्त जनसंपर्क अधिकारी वीणा गावडे, नवी मुंबईतील साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, पत्रकार सर्वश्री राजेंद्र घरत, खंडुराज गायकवाड, नारायण जाधव, नवी मुंबई महापालिकाचे जनसंपर्क अधिकारी तथा निवेदक, कवी, लेखक महेंद्र कोंडे, माध्यमकर्मी सर्वश्री डॉ. बबन जोगदंड, सी.के. सुब्रह्मण्यम, प्रवचनकार संध्याताई अमृते, मिशन आयएएस अकादमीचे संचालक , लेखक- प्रभावी वक्ते, प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे, दूरचित्रवाणी पत्रकार मनोज भोयर, संपादक वैशाली आहेर, लेखिका - प्रकाशिका लता गुठे, लेखक प्रा. डॉ. सतीश शिरसाठ, आनंदयात्री मदन लाठी, संपादक मारुती विश्वासराव, पत्रकार किरण बोळे, कवी अशोक बागवे, हास्य कवी अशोक नायगावकर, प्रभावी वक्ते प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण, गायक-संगीतकार मधुकर घोडविंदे, अष्टपैलू कांचन कंदले आणि बालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे वाचनालये उभारणारी मरियम मिर्झा आदींच्या प्रेरणादायी यशकथा या पुस्तकात आहेत. या पुस्तकाची निर्मिती ग्रंथाली ने तर प्रकाशन न्यूज स्टोरी टुडे ने केले आहे. प्रसार माध्यमांमध्ये काम करण्याची इच्छा बाळगणाऱ्या तरुण तरुणींनी तर हे पुस्तक अवश्य वाचलेच पाहिजे पण माध्यमांचे अंतरंगाविषयी उत्सुकता असणाऱ्या वाचकांनी देखील हे पुस्तक वाचलेच पाहिजे असे आहे.

**-शेषराव वानखेडे.**
**ज्येष्ठ पत्रकार.**
**९८६९४ ८४८००**

# जागतिक पितृदिन

जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) २१ जून २०२६ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.आई जेव्हा मुलांना कडेवर घेते तेव्हा तीला वाटते की, माझ्या बरोबरीने तीने जग पहाव आणि वडील जेव्हा मुलांना खांद्यावर घेते तेव्हा त्याला वाटते की, मला न दिसणारे जग सुध्दा त्यानी पहावे.या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार, संस्कृती, जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा, ताई-दादा, आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई- वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधःकार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### मुलांची वैद्यकीय, मानसिक आरोग्य, प्रवासाची माहिती आणि पालकांच्या उत्पन्नाशी संबंधित गोपनीय डेटा लीक

# डेटा सार्वजनिक न करण्यासाठी ७,५०,००० अमेरिकन डॉलर्सची खंडणी मागितली

*मुंबई उच्च न्यायालयाने गुगलला ईमेल आयडी ब्लॉक करण्याचे दिलेले निर्देश*

**मुंबई- प्रतिनिधी**

प्रतीक्षा फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट या शैक्षणिक संस्था चालवणाऱ्या संस्थेवर झालेल्या सायबर हल्ल्यामुळे हजारो मुलांच्या संवेदनशील माहितीच्या गोपनीयतेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. फुलक्रमसेक नावाच्या हॅकिंग ग्रुपने या ट्रस्टच्या डेटाबेसमध्ये घुसखोरी करून मुलांची वैद्यकीय, मानसिक आरोग्य, प्रवासाची माहिती आणि पालकांच्या उत्पन्नाशी संबंधित गोपनीय डेटा चोरला आहे. या हॅकिंग ग्रुपने डेटा सार्वजनिक न करण्यासाठी ७,५०,००० अमेरिकन डॉलर्सची खंडणी मागितली होती. या गंभीर परिस्थितीवर तातडीने कारवाई करत मुंबई उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा एक-पक्षीय अंतरिम आदेश दिला आहे.न्यायमूर्ती आरिफ एस. डॉक्टर यांनी १२ जून रोजी हा आदेश पारित केला. या आदेशानुसार, फुलक्रमसेक आणि इतर संबंधित व्यक्तींना चोरी केलेला डेटा लीक, प्रकाशित किंवा प्रसारित करण्यापासून रोखण्यात आले आहे. तसेच, उच्च न्यायालयाने गुगलला या हॅकिंग ग्रुपने वापरलेले ईमेल आयडी ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून गोपनीय माहितीचा पुढील प्रसार थांबवता येईल. न्यायालयाने नमूद केले की, मुलांच्या अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय माहितीचे, विशेषतः त्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित माहितीचे प्रकटीकरण त्यांच्यावर गंभीर आणि हानिकारक परिणाम करू शकते. अशा माहितीमुळे मुलांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, हेही न्यायालयाने अधोरेखित केले. प्रकरणाचे गांभीर्य आणि तातडीची गरज लक्षात घेऊन, प्रतिवादींना नोटीस न देताच हा एक-पक्षीय आदेश देण्यात आला, जेणेकरून अर्जाचा उद्देश सफल होईल.या हॅकिंग ग्रुपविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० अंतर्गत अनेक कायदेशीर कारवाई केल्या जाऊ शकतात. यात सेक्शन ४३ अंतर्गत अनधिकृत प्रवेश आणि डेटा चोरी, सेक्शन ६६ अंतर्गत गुन्हेगारी हेतूने हॅकिंग, सेक्शन ६६बी अंतर्गत चोरी केलेल्या संगणक संसाधनांचा गैरवापर, सेक्शन ६६सी अंतर्गत ओळख चोरी आणि सेक्शन ७२ए अंतर्गत कराराचे उल्लंघन करून माहिती उघड करणे यांसारख्या तरतुदींचा समावेश आहे. सायबर खंडणी हा शब्द कायद्यात स्पष्टपणे परिभाषित नसला तरी, भारतीय दंड संहिता, १८६० च्या सेक्शन ५०३ अंतर्गत फौजदारी धमकावणे यासह माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित तरतुदींखाली खटला चालवला जाऊ शकतो. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन अॅक्ट, २०२३ हा कायदा मुलांच्या डेटा गोपनीयतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या कायद्यानुसार, १८ वर्षांखालील व्यक्तीला बालक मानले जाते आणि मुलांच्या डेटावर प्रक्रिया करण्यासाठी पालकांची पडताळणीयोग्य संमती घेणे बंधनकारक आहे. तसेच, मुलांचे ट्रॅकिंग वर्तणूक निरीक्षण आणि लक्ष्यित जाहिरातींना *(पान २ वर)*

## घरगुती गॅस सिलिंडरच्या कथित काळाबाजाराची चौकशी करा; दोषी एजन्सींचे परवाने रद्द करण्याची मागणी

परतूर-मंठ्यासह जालना जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबवावी; मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**परतूर/मंठा । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासह परतूर व मंठा तालुक्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा कथित काळाबाजार, बोगस ग्राहक नोंदी आणि व्यावसायिक वापरासाठी घरगुती गॅसचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारींची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात परतूर, मंठा तसेच जालना जिल्ह्यातील काही गॅस एजन्सी चालक, कर्मचारी आणि दलाल यांच्या संगनमतातून घरगुती १४.२ किलो एलपीजी गॅस सिलिंडरचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याचा आरोप**

निवेदनानुसार, घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलिंडर हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, चहा हॉटेल, फास्ट फूड सेंटर तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांना पुरविले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना वेळेवर गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

व्यावसायिक वापरासाठी स्वतंत्र १९ किलो क्षमतेचे कमर्शियल सिलिंडर उपलब्ध असतानाही काही ठिकाणी घरगुती सिलिंडरचा वापर होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे शासनाच्या अनुदानित योजनांचा गैरवापर होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

**बोगस ग्राहक नोंदींच्या चौकशीची मागणी**

निवेदनात काही ठिकाणी बोगस ग्राहक नोंदी, आधार कार्डचा गैरवापर, मृत अथवा स्थलांतरित व्यक्तींच्या नावावर सिलिंडर उचलणे यासारख्या प्रकारांच्या तक्रारींचाही उल्लेख करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित गॅस एजन्सींकडील प्रत्यक्ष ग्राहकसंख्या, वितरण *(पान २ वर)*

## धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनेत होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पाण्याच्या टाकीवर केले जाणार आमरण उपोषण

**अंबड - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जे आदिवासींना केस धनगर समाजाला योजनांच्या माध्यमातून लाभ देण्यासाठी राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजना अमलात आणण्यात गेली. धनगर समाजातील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळेमध्ये निवासी शिक्षण मिळावे यासाठी ही योजना खाजगी इंग्रजी शाळांमध्ये सुरू करण्यात आली. अनेक खाजगी इंग्रजी शाळांमध्ये ही योजना सुरू आहे परंतु योजनेच्या नुकसानुसार धनगर समाजातील विद्यार्थ्यांना सुविधा मिळत नाही व एक प्रकारे अन्याय केला जात असल्यामुळे रुई येथील सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ चौरे हे पाण्याच्या टाकीवर आमरण उपोषण करणार आहेत.जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राजे यशंवतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजनेच्या निकषानुसार जालना जिल्हयातील लागु असलेल्या शाळेत निकषानुसार विद्यार्थ्यांना सुविधा मिळत नाही सर्वांत गंभिर बाब म्हणजे या योजने अंतर्गत धनगर समाजातिल विद्यार्थी विद्यार्थीनी शाळेत वस्तीगृहामध्ये निवासी शिक्षण घेणे आवश्यक असतांना अनेक शाळामध्ये वस्तीगृह नाही.योजनेतील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये येजा करावी लागते यामध्ये विद्यार्थीनीची मोठ्या प्रमाणात कुचंबना होते.योजने नुसार पोषण आहार हा निकषानुसार दिल्या जात नाही. तसेच शाळा कपडे व पुस्तक याचे १० ते ५ हजार पर्यंत फी आकारतात याबाबत आपल्या कायर्कालयाच्या *(पान २ वर)*

## परवानगीशिवाय पुतळे उभारणे म्हणजे महापुरुषांचा अवमानः अॅड. महेश धन्नावत

**जालना - प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता महापुरुषांचे पुतळे उभारणे हे त्या महापुरुषांच्या विचारांचा आणि कायद्याचा अपमान करण्यासारखे आहे, असे स्पष्ट मत नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निकालाच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते, ज्यामध्ये न्यायालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परवानगीशिवाय आणि रस्त्यात अडथळा होईल अशा पद्धतीने उभारल्यामुळे तो हटवण्याचे निर्देश कायम ठेवले आहेत. या निकालामुळे देशभरात परवानगीशिवाय पुतळे उभारण्याच्या प्रवृत्तीला चाप बसण्यास मदत होणार आहे.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती लिसा गिल आणि न्यायमूर्ती निनाला जयसूर्य यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, संबंधित पुतळा केवळ परवानगीशिवाय उभारला गेला नाही, तर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४५ अंतर्गत सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी सुरू असलेल्या कार्यवाहीकडे दुर्लक्ष करून उभारण्यात आला. ग्रामपंचायतीने जागा वाटपाचा ठराव रद्द केलेला असतानाही, रात्रीच्या अंधारात हा पुतळा उभारण्यात आला होता. न्यायालयाने म्हटले की, जर परवानगीची गरजच नव्हती, तर याचिकाकर्त्यांनी ग्रामपंचायत आणि महसूल अधिकाऱ्यांकडे परवानगीसाठी अर्ज करण्याची आवश्यकताच काय होती? यावरून हे स्पष्ट होते की, कायद्याची प्रक्रिया टाळून हे कृत्य करण्यात आले. अॅड. महेश धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करत म्हटले की, ''महापुरुष हे कायद्याचे आणि सुव्यवस्थेचे निर्माते आहेत. त्यांचे पुतळे उभारताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे. कायद्याला बगल देऊन, रात्रीच्या अंधारात पुतळे उभारणे ही एकप्रकारे त्या महापुरुषांची विटंबनाच आहे.'' त्यांनी पुढे जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात काही काळापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अशाच प्रकारे रातोरात उभारल्याच्या घटनेचा उल्लेख केला. ते म्हणाले की, ''छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या आदरणीय व्यक्तींनी आपल्याला कायद्याचे राज्य दिले. त्यांचेच पुतळे कायद्याचे उल्लंघन करून उभारले जाणे हे अत्यंत दुःखद आहे.'

अॅड. धन्नावत यांनी नागरिकांना आवाहन केले की, महापुरुषांबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी त्यांच्या विचारांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. पुतळे हे प्रेरणास्रोत असले पाहिजेत, वादाचे कारण नव्हे. जर कोणाला महापुरुषांचा पुतळा उभारायचा असेल, तर त्यांनी रीतसर शासकीय परवानगी *(पान २ वर)*

## राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दत्ता देशमुख**



राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष मा. संजयजी लहाने यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून एकनाथ घाडगे योगशिक्षक तसेच प्रमुख पाहुणे म्हणून भोकरदन येथील योग प्रशिक्षक रवी गावंडे सर यांचे प्रमुख उपस्थिती होती जिजाऊ कॅम्पस टेंभुर्णी येथे जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय तसेच सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी, जिजाऊ आर्ट कॉमर्स सायन्स ज्युनिअर कॉलेज राजमाता जिजाऊ टेंभुर्णी या सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता यांप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयजी लहाने यांनी विद्यार्थ्यांना योग दिनानिमित्त मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थी तसेच शिक्षक यांनी नियमित व्यायाम व योगासने आपल्या दैनंदिन जीवनात करावे व निरोगी राहावे

योगशिक्षक एकनाथ घाडगे तसेच रवी गावंडे सर यांनी विद्यार्थ्यांना योगासने शारीरिक तंदुरुस्तीसाठी आणि मानसिक शांततेसाठी कशी आवश्यक आहेत हे सोप्या भाषेत पटवून दिले तसेच योग ही आपली प्राचीन भारतीय परंपरा असून ती दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प सर्वांनी करावा विद्यार्थ्यांना त्यांनी याप्रसंगी ताडासन,भुजंगासन, अनुलोम विलोम आणि भ्रामरी प्राणायाम यासारख्या अनेक आसनांचे अचूक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना करून दाखवले

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत घेण्यात आले योग दिनानिमित्त शाळेच्या वतीने संपूर्ण परिसर उत्साह आणि सकारात्मक वातावरणाने भरून गेला होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राधा तिवारी यांनी केले

कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता जिजाऊ *(पान २ वर)*

## पारंपारिकतेला फाटा देत रक्षाविसर्जनाऐवजी शेतात लावले आंब्याचे झाड

वृक्षरूपाने जपल्या सवडे कुटुंबाने आईच्या आठवणी,, जल प्रदूषण टाळले

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी : जुन्या, पारंपरिक रूढी- परंपरांना छेद देत, शेतातच रक्षा विसर्जन करून वृक्षरूपाने आईच्या आठवणी जपण्याचे काम येथील सवडे कुटुंबाने घेऊन आदर्श निर्माण केला आहे. दि. १७ जून २०२६ रोजी सरूबाई रामराव सवडे यांचे निधन झाले. दुःखातही या कुटुंबाने पर्यावरणपूरक निर्णय घेऊन समाजासमोर एक आदर्श घालून दिला आहे.

**मी देशाच्या सीमेवर राहून देशाची सेवा केली. आज आईच्या जाण्याने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तिच्या स्मृती जिवंत वृक्षाच्या रूपाने सदैव आमच्यासोबत राहाव्यात, अशी इच्छा होती. नदी-तलाव प्रदूषित करण्यापेक्षा निसर्गाला काहीतरी परत देणे हीच आईला खरी श्रद्धांजली ठरेल, याच भावनेतून आम्ही आंब्याचे झाड लावण्याचा निर्णय घेतला.**
**- माजी सैनिक मोहन रामराव सवडे, अकोलादेव.**
**राहतील. अशी भावना सवडे कुटुंबातील सदस्यांनी व्यक्त केली.**

रक्षाविसर्जन हे नदी किवा तलावाच्या पाण्यात करण्याची परंपरा आहे. परंतु, यामुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी आणि आपल्या लाडक्या व्यक्तीची आठवण कायमस्वरूपी जपण्यासाठी सवडे *(पान २ वर)*

## घामाच्या धारात न्हावून निघताय विद्यार्थी आणि शिक्षक : जिल्हा प्रशासन आदेश लाल फितीत अडकले

**दत्ता देशमुख**



टेंभुर्णी अलनिनोच्या तीव्र सावटा मुळे यावर्षी पावसाळा लांबला आहे. सध्या मृग नक्षत्र अर्ध्यावर आले तरीही उन्हाचा पारा चाळीसच्या खाली उतरायचे नाव घेईना. त्यातच जिल्ह्यातील सर्व शाळा १५ जून पासून नियमित सुरू झाल्या. सध्या भर उन्हात १० ते ४ या वेळात शाळा भरत आहे. कडाक्याचे ऊन व कमालीचा उकाडा यामुळे सध्या जिल्ह्यातील विद्यार्थी व शिक्षक घामाच्या धारात नाहुन निघत आहे. उन्हाची तीव्रता कमी होंईपर्यंत जिल्ह्यातील शाळा सकाळ सत्रात भरवाव्यात अशी मागणी पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांतून होत आहे. मात्र शाळा उघडून आठवडा उलटला तरीही अद्यापही जिल्हा प्रशासन मात्र याबाबत उदासीन असून आतापर्यंत सकाळ सत्र शाळेबाबत कुठलाच निर्णय न झाल्याने भविष्यात उन्हामुळे विद्यार्थी आजारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासने त्वरित जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळ सत्रात भरवण्याबाबत निर्णय घ्यावा अशी ओरड जिल्हाभर होत आहे. यावर्षी कधी नव्हे एवढा उन्हाळा तापला आहे. जिल्ह्यात सध्या कुठेही पाऊस पडला नसल्याने जिल्ह्यातील तापमान दिवसेंदिवस वाढत आहे अशातच ग्रामीण भागात आजही जिल्हा परिषद शाळेच्या अनेक खोल्या पत्राच्या आहेत त्यामुळे कडाकाच्या उन्हात तप्त झालेल्या या खोल्यात विद्यार्थी व शिक्षकांना बसणे असाह्य होत आहे. याशिवाय अनेक गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने शाळेत विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही निर्माण होत आहे. या सर्व गंभीर बाबीचा विचार करता आपत्ती व्यवस्थापनाला प्राधान्य देत जिल्ह्यातील सर्व शाळा निदान ३० जून पर्यंत सकाळ सत्रात भरवाव्यात अशी मागणी टेंभुर्णी सह परिसरातील पालक व शिक्षकातून होत आहे. चौकट - प्रशासनाने लवकर निर्णय घ्यावा ग्रामीण भागात सध्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना पत्राच्या खोल्यात बसणे अवघड झाले आहे. यामुळे शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना उलट्या व ताप यासारखे आजार होत आहे. याबाबत आपण जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधून विद्यार्थी व शिक्षकांच्या आरोग्याच्या हितासाठी जिल्ह्यातील शाळा सकाळ सत्रात भरवण्याबाबत विनंती केली आहे. प्रशासनाने याबाबत लवकर निर्णय घेऊन चांगला पाऊस *(पान २ वर)*

## जागतिक विधवा दिनानिमित्त २३ जून रोजी राज्यभर 'एकल महिला दिन' साजरा करण्याचे आवाहन

**परतूर -प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय स्तरावर २३ जून हा दिवस ''जागतिक विधवा दिन'' म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका आणि महापालिकांमध्ये ''एकल महिला दिन'' आयोजित करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या उपक्रमाचे स्वागत करत साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्याचे राज्य निमंत्रक मा. हेरंब कुलकर्णी व आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालना यांनी राज्यातील सर्व सरपंच, नगराध्यक्ष, महापौर व लोकप्रतिनिधींना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात एकल महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे.

या कार्यक्रमांद्वारे विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित व निराधार महिलांच्या समस्या जाणून घेण्यास मदत होईल.

तसेच त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजनांची माहिती, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करता येतील.

**''एकल महिलांच्या समस्या केवळ वैयक्तिक नसून त्या सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाच्या आहेत. जागतिक विधवा दिनानिमित्त साजरा होणारा एकल महिला दिन हा त्यांच्या वेदना समजून घेण्याचा आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी ठोस कृती करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन एकल महिलांना रोजगार, शासकीय योजनांचा लाभ आणि सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.''**

**मा. हेरंब कुलकर्णी राज्य निमंत्रक,**
**साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्य**

**एकल महिलांचे सक्षमीकरण ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून ती विकासाची गरज आहे. शासनाच्या विविध योजना विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित आणि निराधार महिलांसाठी उपलब्ध आहेत; या मिळन देण्यासाठी समजिक संस्था च्या मध्यामातुन जनजागृती केली जाईल प्रत्येक गाव आणि शहर पातळीवर विशेष जनजागृती करून एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगाराच्या संधी आणि आर्थिक स्वावलंबनासाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे.''**

**मा. एकनाथ राऊत**
**अध्यक्ष, बाल कल्याण समिती, जालना.**

मा. हेरंब कुलकर्णी यांनी सर्व लोकप्रतिनिधींना आवाहन केले आहे की, गाव व शहरातील जास्तीत जास्त एकल महिलांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करावेत. एकल महिलांचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या स्वावलंबनासाठी ठोस उपाययोजना करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.